**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 18.09.2025** **वार- गुरुवार**

---

**स्वच्छता**

पुणे महापालिकेच्यावतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. या अभियानाचे उद्घाटन आयुक्त नवलकिशोर राम यांच्या हस्ते झाले. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवसापासून ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत 'स्वच्छता पंधरवडा' साजरा केला जात आहे. दरम्यान पिंपरी चिंचवड महापालिकेचेवतीने नागरिकांना माहिती देण्यासाठी 'सेवा पंधरवडा' उपक्रमांतर्गत गणेश कला-क्रीडा मंच येथे माहिती दालन उभारण्यात आलं आहे.

**स्वनासप**

स्वस्थ नारी, सशक्त परिवार या अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयात 2 हजार 100 हून अधिक

महिला आणि बालकांची तपासणी करण्यात आली. तसेच या ठिकाणी क्षयरोग रुग्णांना किटचे वाटपदेखील करण्यात आले.

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त काल पुण्यात आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशा ड्रोन शोचे आयोजन केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यातर्फे स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आलं. 'ज्योतीने तेजाची आरती' या ड्रोन शोव्दारे पुणेकरांच्या वतीने पंतप्रधान मोदींना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात देण्यात आल्या, थ्रीडी स्वरूपात हा ड्रोन शो मधे मोदी सरकारच्या कामगिरीसह पुण्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक मानबिंदूंचे दर्शनही पुणेकरांना घडले.

**रिंगरोड**

पुणे शहर आणि परिसरातील रिंग रोडच्या कामाला गती मिळाली आहे. रिंग रोडच्या सोलू ते निरगुडीमधील तीन गावांची भूसंपादन प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, टप्पा दोन, तीन आणि चारसंदर्भातील भूसंपादन प्रक्रिया आणि मोजणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्याचे आदेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिले आहेत. प्रस्तावित रिंग रोडच्या भूसंपादन प्रक्रियेसंबंधी सुरू

असलेल्या कार्यवाहीचा पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी प्रशासकीय यंत्रणांकडून आढावा घेतला.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महापालिकेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या स्तरावर तयारी सुरु झाली आहे. या सर्व प्रक्रियेत एकंदर २४ हजार कर्मचाऱ्यांची गरज भासणार असल्याने निवडणूक शाखेकडून मनुष्यबळाची जुळवाजुळव सुरु झाली आहे. आतापर्यंत १९ हजार कर्मचाऱ्यांची माहिती संकलित झाली आहे. पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांसह संपूर्ण शहराची नवीन प्रभाग रचना तयार झाली आहे. ही प्रभाग रचना ६ ऑक्टोबर पर्यंत अंतिम होणार आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासनाने विभागीय आयुक्तांकडे १७ निवडणूक अधिकारी आणि सहायक निवडणूक अधिकाऱ्यांची मागणी केली आहे.

**<u>बाबाआढाव</u>**

माथाडी कामगारांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या कायद्यातील दुरुस्त्या मागे घेतल्या नाहीत तर राज्यव्यापी जेल भरो आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा इशारा ज्येष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांनी पुण्यात दिला. पुणे महसूल आयुक्त कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या वतीने सुरू असलेल्या धरणे सप्ताह आंदोलनात ते बोलत होते. आंदोलनाच्या सुरुवातीला

गुलटेकडी धान्य बाजारातून हमाल पंचायतीचे सरचिटणीस गोरख मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली रॅली काढण्यात आली.

**<u>महाकृषीॲप</u>**

२०२५ च्या रब्बी हंगामात शेतकऱ्यांच्या उत्पादकतेला चालना देण्यासाठी विविध मोहिमांची अंमलबजावणी महाकृषी ॲपद्वारे करणे अनिवार्य करण्यात आले आहे. २०२५ च्या खरीप हंगामात महाकृषी ॲपवर ४ लाख ३० हजार ७३३ मोहिमांची नोंदणी झाली असून, शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पुणे कृषी आयुक्तालयाने सांगितले आहे.

**<u>आयएमए</u>**

सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी म्हणजे सीसीएमपी पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांनी ॲलोपॅथी औषधांचा वापर करण्यास परवानगी देण्याचा पुण्यातील इंडियन मेडिकल असोसिएशनने निषेध केला आहे. या निर्णयाचा निषेध म्हणून आजपासून २४ तासांसाठी संपूर्ण वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात येणार असल्याचे आयएमएचे अध्यक्ष डॉ. सुनील इंगळे यांनी सांगितलं आहे.

**<u>करंडक</u>**

यंदाच्या विनोदोत्तम करंडक राज्यस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धेत मएसो वरिष्ठ महाविद्यालयाच्या 'यथा प्रजा तथा राजा' या एकांकिकेनं

प्रथम क्रमांकाचं पारितोषिक पटकावत विनोदोत्तम करंडकावर आपलं नाव कोरलं. व्दितीय क्रमांकाचं पारितोषिक चिंचवड येथील ऱ्हस्व-दीर्घच्या 'मृत्यूमोनी डॉट कॉम' या एकांकिकेनं तर तृतीय क्रमांकाचं पारितोषिक आकुर्डी येथील विहंग कला मंडळाच्या 'ऑपेराची सुपारी' या एकांकिकेनं पटकावलं.

**अंत्यसंस्कार**

ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि ‘शिवचरित्र’कार गजानन भास्कर मेहेंदळे यांच्या पार्थिवावर आज वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी त्यांचं पार्थिव भारत इतिहास संशोधक मंडळात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं पांडुरंग बलकवडे, सुधीर थोरात, अरविंद जामखेडकर, गो. बं. देगलूरकर यांच्यासह संशोधन, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रांतील मान्यवरांनी अंत्यदर्शन घेतले. मेहेंदळे यांचं काल वयाच्या ७८ वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं होतं. शनिवार २७ सप्टेंबर रोजी संध्याकाळी साडे पाच वाजता भारत इतिहास संशोधक मंडळ येथे सर्व संस्थांच्यावतीनं श्रद्धांजली सभेचं आयोजन करण्यात आलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज संध्याकाळी मुसळधार पावसान झोडपून काढले या जोरदार पावसामुळे सखल भागात पाणी साचले असून ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती

आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता. मेघगजजना व ववजांच्या कडकडाटासह अगत हलक्या ते हलक्या थवरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**